# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**आष्टी, पाटोदा व शिरुर (जि.बीड) तालुक्यातील पाझर व साठवण तलावांच्या सांडवा व भिंतीची दुरवस्था झाल्याबाबत**

**(१) ३८८९४ (२१-०१-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी, पाटोदा व शिरुर (जि.बीड) तालुक्यांत अनेक पाझर आणि साठवण तलावांची निर्मिती करण्यात आली असून देखभाल दुरुस्ती अभावी अनेक तलावांच्या सांडवा आणि भिंतीची दुरवस्था झाली असल्याचे सन १९७२ पासून ते आतापर्यंत निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तलावांच्या दुरुस्तीसाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच दुरुस्तीसाठी कालबध्द कार्यक्रम आखण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर तलावांच्या दुरुस्तीचे कामे किती कालावधीत सुरु होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२५-०५-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, बीड व लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, बीड या दोन्ही विभागांतर्गत आष्टी, पाटोदा व शिरूर या तीनही तालुक्यात मिळून ० ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या एकुण १५२६ तलावांपैकी ४११ तलावांना दुरूस्तीची आवश्यकता आहे. दुरूस्ती आवश्यक असलेल्या ४११ तलावांपैकी ७४ तलावांची दुरूस्ती प्रगतीपथावर आहे. या तलावांच्या दुरूस्तीची किंमत रू.३५९.५३ लक्ष इतकी आहे.

उर्वरित ३३७ तलावांच्या दुरूस्तीसाठी रू.२७.७७ कोटी निधीची आवश्यकता असून, सदर दुरूस्ती निकट भविष्यात जलयुक्त शिवार अभियानातून अथवा अन्य योजनेतून निधी उपलब्धतेनुसार प्रस्तावित करण्याचे नियोजन आहे.

---

**राज्यातील नाशिकसह अन्य जिल्ह्यातील पुरातन काळातील बारव जलसाठ्यांचे संवर्धन करण्याबाबत**

**(२) ५७९२५ (१०-०८-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन दुष्काळी परिस्थितीवर मात करण्याकरिता पाण्याचे नवनवीन स्त्रोत शोधात असताना राज्यातील नाशिकसह अन्य जिल्ह्यातील पुरातन काळातील बारव जलसाठ्यांकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही मुबलक पाणीसाठा उपलब्ध असलेल्या अशा पुरातन काळातील बारव जलसाठ्यांचे सवंर्धन करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (३१-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) ज्ञात पुरातन जलसाठ्यांचे संवर्धन करण्याकरिता पाहणी करण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्यात येते.

उस्मानाबाद जिल्हयातील बारवांचे संवर्धन करण्याकरिता पाणी टंचाई सन २०१३-१४ अंतर्गत मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून महात्मा फुले जलभूमी अभियानाद्वारे २७ बारवातील व जुन्या आडातील गाळ काढून २४ गावे व वाड्यातील पाणीटंचाई काही अंशी दूर करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात जलयुक्त शिवार योजेनेच्या लोकप्रतिनीधी त्यांचा स्थानिक विकास निधी देत असले कामांमध्ये होत असलेला गैरव्यवहार**

**(३) ५९९४४ (२४-०८-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जलयुक्त शिवार योजेनसाठी लोकप्रतिनीधी त्यांचा स्थानिक विकास निधी देत असले तरी या कामामध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याचे निरिक्षण ऑब्झर्व्हर रिसर्च फाऊंडेशन या संस्थैने आपल्या पहाणीत नोंदवले असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गैरव्यवहार टाळण्यासाठी लोक सहभागातून होणाऱ्या कामांना अधिक प्राधान्य देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (३१-०५-२०१८) :** (१) ऑब्झर्व्हर रिसर्च फाऊंडेशने जलयुक्त शिवार योजनेसंदर्भात विविध निरीक्षणे नोंदविताना असा निष्कर्ष काढलेला आहे की, जलयुक्त शिवार अभियानाचे यश खरोखरच उल्लेखनीय आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भूम (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील नान्नजवाडी येथील पाझर तलाव अतिवृष्टीमुळे खचल्याबाबत

**(४) ६६४४० (१६-१२-२०१६). श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूम (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील नान्नजवाडी येथील पाझर तलाव माहे सप्टेंबर, २०१६ च्या अखेरीस अतिवृष्टी झाल्याने चार फूट खचला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तलाव फुटण्याचा धोका निर्माण झाल्याने बेदरवाडी, जयवंतनगर या गावातील हजारो नागरिकांच्या जिवीतास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पाझर तलाव त्वरित दुरुस्त करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ रोजी लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२१-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३), (४) व (५) जिल्हा परिषद, उस्मानाबाद लघु पाटबंधारे विभागामार्फत नान्नजवाडी पाझर तलावाचे काम सन १९७८-७९ मध्ये पूर्ण करण्यात आलेले आहे. गत ३० वर्षात सदर पाझर तलावाची एकदाही दुरूस्ती झाली नसल्याने कंदभरणी भागात भराव अंशत: खचला आहे. तथापि सदर तलाव फुटण्याचा कोणत्याही प्रकारचा धोका निर्माण झालेला नाही.सदयस्थितीत सदर तलावाच्या दुरूस्ती कामास सन २०१७-१८ च्या जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत रू.६.०० लक्ष रक्कमेची प्रशासकिय मान्यता व रू.५.६६ लक्ष रक्कमेची तांत्रिक मान्यता देण्यात आली असून, तलाव दुरूस्तीचे काम सदयस्थितीत निविदा प्रक्रियेत आहे. सदर काम जून, २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

## नंदाळे बु. (ता.जि.धुळे) येथील पुरामुळे वाहून गेलेल्या संरक्षण भिंतीच्या कामास निधी मंजूर करण्याबाबत

**(५) ७४४९९ (१९-०४-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदाळे बु. (ता.जि.धुळे) येथील गावाजवळ असलेला एम.आय.टँक मुसळधार पावसाने फुटल्याने गावालगत असलेली संरक्षण भिंत पुरामुळे वाहून गेली असल्यामुळे सदरील काम तातडीने होण्यासाठी निधी मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भिंत नव्याने बांधण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी अंदाजपत्रक बनवून जिल्हाधिकारी यांना पूर दुरुस्ती निधी मिळण्याबाबतचे अंदाजपत्रक सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर अंदाजपत्रकास मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (३१-०५-२०१८) :** (१) नंदाळे बु.ता.जि.धुळे येथील गावाजवळ एम.आय.टँक नसून जुना ब्रिटीशकालीन तलाव आहे. सदर तलाव सन २०१६ मध्ये झालेल्या मुसळधार पावसाने फुटल्यामुळे सदर गावालगत असलेली संरक्षण भिंत पुरामुळे वाहून गेली आहे.

(२) व (३) सदर कामाच्या दुरूस्तीचे रू.३७.५७ लाख रक्कमेचे अंदाजपत्रक लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, धुळे विभागामार्फत तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकास प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे. तसेच कामाची ई- निविदा कार्यवाही पूर्ण झाली असून कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.

नंदाळे बु. गाव जलयुक्त शिवार अभियान सन २०१७-१८ मध्ये समाविष्ट असून प्रस्तुत काम माहे जून, २०१८ पूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उंबर्डा (ता.कारंजा, जि.वाशिम) येथील सिमेंट बंधाऱ्याच्या कामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आल्याबाबत**

**(६) ७५५८८ (१९-०४-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंबर्डा (ता.कारंजा, जि.वाशिम) येथील उंघडीबाजार, जांब मार्गावरील आमराई परिसरातील शासकीय विहिरीजवळ बांधण्यात येत असलेल्या सिमेंट बंधाऱ्याच्या कामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (३१-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**किनळोस-बागवेवाडी (जि.सिंधुदुर्ग) येथील ओढयावर बांधण्यात आलेला**
**बंधाऱ्याची झालेली दुरवस्था**

**(७) ८५७२६ (१४-०८-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनळोस-बागवेवाडी (जि.सिंधुदुर्ग) येथील ओढयावर १५ वर्षापूवी ५ लाखांचा निधी खर्च करुन बांधण्यात आलेल्या बंधा-याचा एकदाही वापर करण्यात न आल्यामुळे वापराअभावी बंधा-याची दुरवस्था झाल्याचे नुकतेच माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु बंधा-याचा एकदाही वापर न होण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, बंधारा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०१-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) सन २०१६-१७ मध्ये किनळोस गावाचा समावेश जलयुक्त शिवार योजनेंतर्गत झालेनंतर सदर बंधाऱ्याच्या दुरूस्तीचे काम हाती घेऊन पूर्ण करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिंदी बु. व असदपूर (ता.अचलपूर, जि.अमरावती)**
**गावात पाण्याची टंचाई असल्याबाबत**

**(८) ८८०४७ (११-०८-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिंदी बु. व असदपूर (ता.अचलपूर, जि.अमरावती) गावात पाण्याची टंचाई असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूगर्भातील खोल गेलेल्या पाण्याचे पुनर्भरण करण्यासाठी जलशिवार योजनेंतर्गत तलाव, बंधारे, शेततळे १० बाय १० मी. चे तळयांना शासनाने मंजूरी देऊन सदर योजनेची त्वरीत अंमलबजावणी करण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (३१-०५-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

शिंदी बु. गावात पाणीटंचाई आढळून आलेली होती.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मौजे शिंदी बु. गावाची जलयुक्त शिवार अभियान सन २०१५-१६ मध्ये निवड करण्यात आली होती. या गावात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत १ नाला खोलीकरणाचे काम, २ साठवण तळी ही कामे पूर्ण करण्यात आली आहेत. मागेल त्याला शेततळे योजनेंतर्गत ०३ पात्र लाभार्थींना कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.

असदपूर गाव जलयुक्त शिवार योजनेत समाविष्ट नसून या गावात मागेल त्याला शेततळे योजनेंतर्गत २ पात्र लाभार्थींना कार्यारंभ आदेश देण्यात आले असून काम पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आखाडा-बाळापूर (जि.हिंगोली) गाव जलयुक्त शिवार योजनेत समाविष्ट करण्याबाबत**

**(९) ८८९९२ (१९-०८-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आखाडा-बाळापूर (जि.हिंगोली) हे गाव जलयुक्त शिवार योजनेत समाविष्ट न केल्यामुळे तेथील बाजार गल्लीला दरवर्षीप्रमाणे पुराचा धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बाबत शासनाने निर्णय घेऊन आराखडा-बाळापूरचा जलयुक्त शिवार योजनेत समाविष्ठ करुन येथील पुराचा प्रश्न कायमचा निकाली काढण्यासाठी ओढयाचे रुंदीकरण, खोलीकरण व सरळीकरण व बाळापूरवाडी जवळील धोकादायक पुलाची ऊंची वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२४-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) सन २०१७-१८ मध्ये आखाडा बाळापूर गाव जलयुक्त शिवार गाव निवड निकषात येत नसल्यामुळे या गावाची निवड करण्यात आलेली नाही. आखाडा बाळापूर गावाची जलयुक्त शिवार अभियान सन २०१८-१९ या वर्षात नियमानूसार निवड करणेबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

---

**देगलुर व बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील नदी पुनर्जीवन विकास योजनेंतर्गत कामांच्या प्रस्तावाबाबत**

**(१०) १००१२० (२६-१२-२०१७). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलुर व बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील नदी पुनर्जीवन विकास योजनेंतर्गत लोकप्रतिनिधीनी सुचविलेल्या कामाचे प्रस्ताव मंजुरीस्तव तात्काळ शासनास सादर करण्याचे निर्देश दिनांक २३ मार्च, २०१७ रोजी वा त्या सुमारास लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, नांदेड यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (३१-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) नदी पुनर्जीवन कार्यक्रमांतर्गत प्राप्त प्रस्तावांना मा.मंत्री, मृद व जलसंधारण यांचे अध्यक्षतेखालील व मा.राज्यमंत्री, मृद व जलसंधारण यांचे सह अध्यक्षतेखालील समितीपुढे ठेवून मान्यता देण्यात येते. प्रस्तुत प्रस्ताव सदर समितीसमोर पुढील बैठकीत ठेवण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दर्यापूर (जि.अमरावती) तालुक्यातील गौरखेडा धरण दुरुस्ती व नदीजोड प्रकल्पाबाबत

**(११) १०१५१६ (२६-१२-२०१७). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दर्यापूर (जि.अमरावती) तालुक्यातील गौरखेड ड्रायझोन परिसरातील धरणाच्या भिंतींला गळती लागल्याने सदरील प्रकल्पामध्ये पाण्याचा साठा न झाल्याने शेतीकरिता सिंचन झाले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाची दुरुस्ती करण्याची मागणी लोकप्रतिनिधीनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच याच परिसरात टोंलफोडी मध्यम प्रकल्पामध्ये पाणी येण्याचा ओघ जास्त असून पाणी साठवण क्षमता कमी असल्याने पावसाळ्यामध्ये पाण्याचा मोठ्या प्रमाणात विसर्ग होत असल्याने खिराळा येथील पुलावरून पाणी वाहून जात असल्याने ५ गावांचा दळणवळणाचा संपर्क होत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या करिता जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत टोंगफोडी प्रकल्पामध्ये येणाऱ्या नदीचे पाणी गौरखेडा प्रकल्पामध्ये आणण्या करिता मागणी केली आहे, हे ही खरे काय
(५) असल्यास, जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत सदरील नदीजोड प्रकल्प कधी पर्यंत राबविण्यात येणार आहे ?

**प्रा. राम शिंदे (३१-०५-२०१८) :** (१), (२), (३) व (४) होय, हे खरे आहे.
(५) कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प व जलसंपत्ती अन्वेषण विभाग, अमरावती यांनी परिसरातील शेतकऱ्यांसमवेत प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता टोंगफोडी प्रकल्प असलेली नदी गौरखेड प्रकल्पाला जोडल्यास जोड कालव्याची लांबी २ ते २.५ कि.मी.राहील. सदर जोड कालव्याकरिता २१ मी.खोलीचे मऊ व कठिण खडकात खोदकाम आवश्यक असेल व यामधील महत्तम भाग कठिण खडकातील खोदकामातून राहणार असून अंदाजे ३.०० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे तसेच त्याकरिता वन जमिनीची आवश्यकता आहे त्यामुळे सदर काम जलयुक्त शिवार योजनेंतर्गत व्यवहार्य ठरत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागाचे अनेक प्रकल्प नादुरुस्त असल्याबाबत**

**(१२) १०२४२७ (०२-०१-२०१८). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील सिंचनाखालील क्षेत्रात वाढ व्हावी या उद्देशाने मागील दोन दशकात मोठ्या प्रमाणात लघु, मध्यम तसेच पाझर तलाव मोठ्या प्रमाणात उभारण्यात आले आहेत परंतु यापैकी बहुतांश तलाव हे दुरुस्तीअभावी पावसाळ्यानंतर दोन ते अडीच महिन्यातच रिकामे होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागाकडे अशा गळक्या प्रकल्पांच्या दुरुस्तीचे सुमारे २६१ प्रस्ताव दाखल करण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तलावांची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार तलावांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२७-०५-२०१८) :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे,
(३) जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभागामार्फत२४८ तलाव दुरुस्तीसाठी रु.२३२२.४२ लक्ष निधीची तरतुद होऊन ११२ कामे पूर्ण झाली असुन ६६ कामे प्रगतीत आहे आणि उर्वरीत ७० कामे निवीदा स्तरावर आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लातूर जिल्ह्यातील कार्यकारी अभियंता जलसंधारण (लघु सिंचन) विभागातील जलयुक्त शिवार योजनेची कामे अपूर्ण असल्याबाबत**

**(१३) १०२६९६ (२६-१२-२०१७). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील कार्यकारी अभियंता जलसंधारण (लघु सिंचन) विभागातील जलयुक्त शिवार योजनेंतर्गत मंजूर असलेली सन २०१४ ते २०१६ या कालावधीतील सिमेंट बंधारे बांधकामाची कामे अद्यापही मोठ्या प्रमाणावर अपूर्ण असल्याचे व अनेक कामाचा निधी अखर्चित असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विभागाकडे किती कामे मंजूर असून किती कामे अद्यापही अपूर्ण आहेत व सदर कामामुळे किती पाणीसाठा झाला व कामे अपूर्ण असल्यामुळे किती पाणीसाठा होऊ शकला नाही याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व सदर कामे अपूर्ण असण्याची व निधी अखर्चित राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत व अपेक्षित पाणीसाठा करून सिंचन क्षमता वाढविण्याबाबत शासनास किती कालावधी लागेल ?

**प्रा. राम शिंदे (३१-०५-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) जलयुक्त शिवार अभियान सन २०१५-१६ मध्ये ३८४ मंजूर कामापैकी ३७१ कामे पूर्ण झाली असून ४ कामे प्रगतीपथावर आहेत व ९ स्थानिक अडचणी व शेतकऱ्यांच्या विरोधामुळे कामे रद्द करण्यात आली आहेत. पूर्ण झालेल्या कामामुळे ४१११.४८ सघमी पाणीसाठा निर्माण झाला आहे.

तसेच सन २०१६-१७ मध्ये मंजूर १५८ कामापैकी १०३ पूर्ण झाली असून २४ कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरित कामापैकी २१ कामे निविदा प्रकियेत असून १० कामे नाल्याचा प्रवाह व शेतात रब्बी हंगामातील पिके असल्यामुळे पूर्ण होऊ शकली नाहीत. पूर्ण झालेल्या कामामुळे ८९४.२४ सघमी पाणीसाठा निर्माण झाला आहे.

स्थानिक अडचणी व शेतकऱ्यांच्या विरोध तसेच नाल्याचा प्रवाह व शेतात रब्बी हंगामातील पिके असल्यामुळे काही कामे पूर्ण होऊ शकली नाहीत.

(४) सन २०१६-१७ मधील अपूर्ण कामे पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

---

### राज्यात मागील चार वर्षात ५३ वाघांचा मृत्यू झाल्याचे आढळून आल्याबाबत

**(१४) १०४९१० (०७-०४-२०१८). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.चरण वाघमारे (तुमसर), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी),**

**श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.अजित पवार (बारामती), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील चार वर्षात ५३ वाघांचा मृत्यू झाल्याचे आढळून आले असून त्यामध्ये मागील वर्षात २२ वाघांचे मृत्यू झाले त्यातील १३ वाघांचा मृत्यू हा नैसर्गिक ८ वाघांचा शिकारीमुळे व १ वाघाचा मृत्यू अपघातात झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच शासनाने वाघ संर्वधनाच्या जनजागृतीसाठी कोणकोणते प्रयत्न केले आहेत वा करण्यात येत आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०५-२०१८) :** (१) राज्यात सन २०१४ मध्ये ६ वाघांचा, सन २०१५ मध्ये १३ वाघांचा, सन २०१६ मध्ये १४ वाघांचा व सन २०१७ मध्ये २२ वाघांचा मृत्यु झाला आहे. सन २०१७ मधील २२ वाघांपैकी १२ वाघांचा नैसर्गिकरित्या, ६ वाघांचा शेतात लावलेल्या विद्युत प्रवाहामुळे, ३ वाघांचा विषप्रयोगामुळे व एका वाघाचा मृत्यु रस्त्यावरील वाहनाच्या धडकेने झालेले आहे.

(२) शेतात लावलेल्या विद्युत प्रवाहामुळे व विषप्रयोगामुळे मृत्युमुखी पडलेल्या वाघांच्या ७ प्रकरणात चौकशी करण्यात आली असून २९ आरोपींना अटक करुन न्यायालयासमोर हजर करण्यात आले आहे.

वरील ७ प्रकरणांपैकी २ प्रकरणात आरोपींविरुध्द चौकशी करुन तक्रार न्यायालयात न्यायप्रविष्ठ करण्यात आली आहे. इतर प्रकरणी आरोपीविरुध्द चौकशी प्रगतीपथावर असून चौकशी पुर्ण होताच तक्रार न्यायालयात न्यायप्रविष्ठ करण्यात येईल.

(३) राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठाण (NTCA) यांचेकडून प्राप्त होणाऱ्या मार्गदर्शक सुचनांचे अनुषंगाने तसेच क्षेत्रिय स्तरावर वन्यप्राण्यांच्या सुरक्षेसाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

• नियमित गस्तीव्दारे वन्यप्राण्यांच्या हालचालींचे सनियंत्रण करण्यात येते. याकरिता अत्याधुनिक साधनसामुग्री जसे बिनतारी संदेश यंत्रणा, कॅमेरा ट्रॅप, जीपीएस, पीडीए यांचा वापर करण्यात येतो.

• ज्या भागात वाघाचे/ बिबटयाचे संघर्षाची स्थिती निर्माण होते, त्याठिकाणी जंगलात न जाण्याबाबत सावधानतेचा इशारा दर्शक पोस्टर्स लावण्यात आलेले आहेत व आवश्यक ठिकाणी जलद प्रतिसाद चमू गठीत करण्यात आलेली आहे.

• वन्यप्राण्यांसाठी जंगलात पाण्याचे स्त्रोत (पाणवठे, सिमेंट प्लग बंधारे, वनतलाव इ.) निर्माण करण्यात येतात.

• ग्रामस्थांचे वनावरील अवलंबत्व कमी व्हावे व मानव वन्यजीव संघर्षाला आळा बसावा म्हणून डॉ. शामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजनेंअतर्गत गावातील कुटूंबाना एलपीजी गॅस पुरवठा करण्यात येत आहे.

• महत्वाच्या ठिकाणी तपासणी नाके, संरक्षण कुटया उभारण्यात आलेले असून वनकर्मचारी रात्र-दिवस गस्त करतात. तसेच श्वानपथक निर्माण करुन त्याचा उपयोग करण्यात येतो.

• विद्युत प्रवाहाव्दारे होणाऱ्या शिकारीच्या घटनांवर सनियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगाने विद्युत वितरण कंपनीच्या स्थानिक अधिकाऱ्यांना संयुक्त सभेत पाचारण करण्यात येते. तसेच शेतालगत विद्युत प्रवाह सोडल्यामुळे किंवा विद्युत प्रवाहाच्या सहाय्याने वन्य प्राण्यांची शिकार करणाऱ्यांवर वनविभाग व विद्युत विभागाचे कायदयानुसार दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल याबाबत गावागावात सभा घेऊन लोकांमध्ये जनजागृती करण्यात येते.

• वन्यप्राणी शिकार अथवा वनगुन्हयासंबधी माहिती जलद प्राप्त होण्यासाठी वनविभागाची हेल्प लाईन टोल फ्रि क्रमांक १९२६ कार्यान्वित करण्यात आली आहे.

• प्रत्येक पाणवठयाची वनमजुर/ वनरक्षकांमार्फत पाणवठयातील पाण्याची व पाणवठा सभोवताल परिसराची नियमित तपासणी करण्यात येते.

---

## राज्यात संरक्षित वन क्षेत्रातून स्वतः हून स्थलांतरीत होणा-या कुटुंबांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(१५) १०५४१४ (३१-०३-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अभयारण्ये अथवा राष्ट्रीय उद्यानातील प्राण्यांच्या संरक्षणासाठी, संरक्षित क्षेत्रातील मानवी वस्त्यांचे, संरक्षित क्षेत्रा बाहेर पुनर्वसन करताना, संरक्षित वन क्षेत्रातून, स्वतः हून स्थलांतरीत होणा-या कुटुंबांना, जमीनीच्या बाजार भावाच्या चार पट मोबदला देण्याचा दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निर्णय घेतला, हे खरे आहे काय

(२) असल्यास, शासनाच्या उक्त निर्णयाचे स्वरुप काय आहे, त्यानुसार सदरहू निर्णयाची संरक्षित क्षेत्रात, प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने, अद्यापपर्यंत शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत राज्यातील किती अभयारण्ये अथवा राष्ट्रीय उद्यानाच्या संरक्षित क्षेत्रातील, झोपडीधारक कुटुंबांना जमीनीची चार पट मोबदला रक्कम देऊन, वन विभागाचे किती संरक्षित क्षेत्र अतिक्रमण मुक्त करण्यात आले आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३१-०५-२०१८) :** (१) व (२) राज्यातील अभयारण्ये अथवा राष्ट्रीय उद्यानातील गावांचे संरक्षित क्षेत्राबाहेर पुर्नवसन करतांना स्थानातरीत होणाऱ्या कुटूंबाना त्यांच्या जमिनीच्या शिघ्र सिध्द गणक किंमतीच्या चारपट मोबदला देण्याचा निर्णय दि.१२.१०.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला.

दिनांक १०.०१.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील अभयारण्ये व राष्ट्रीय उद्यानातील गावांचे पुर्नवसनासंबंधी दिनांक १२.१०.२०१५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये खालीलप्रमाणे दुरूस्ती करण्यात आली आहे.

• दिनांक ०३.११.२०१२ चे शासन निर्णयानंतर ज्या गावांचे / कुटूंबाचे पुनर्वसन पर्याय १ नुसार झालेले आहे व ज्यांना केवळ रु.१० लक्ष प्रति कुटूंब दिलेले आहे. परंतू त्यांना कोणतीही शेतजमीन दिली नाही व जे कुटूंब शेतजमीन गेल्यामुळे भूमिहीन झालेले आहे, अशा कुटूंबाना त्याच जिल्हयात उपलब्ध असल्यास १ एकरच्या मर्यादेत शेतीयोग्य शासकीय जमिन देण्यात येईल.

• दिनांक ०३.११.२०१२ नुसार पर्याय २ निवडलेल्या कुटूंबांना शिघ्र गणक पध्दतीनुसार निश्चित केलेल्या दराच्या १.३ पट मोबदला व शेतीयोग्य जमीन देण्याची दुरूस्ती करण्यात आली आहे.

• लाभार्थ्यांना देय शेतजमिनीची किंमत राज्य योजना (२४०६-२२४१) मधून सुध्दा देय करण्यात आली आहे.

(३) दिनांक १२.१०.२०१५ च्या शासन निर्णयानुसार मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील १४७ व पेंच व्याघ्र प्रकल्पातील १८४ कुटूंबाना जमिनीच्या बाजारभावाच्या चारपट मोबदला अदा करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई शहरामध्ये मानवी वस्त्यांमध्ये माकडांचा वावर वाढल्याबाबत**

**(१६) १०५६२५ (३१-०३-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरामध्ये मानवी वस्त्यांमध्ये माकडांचा वावर तसेच उपद्रव वाढला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान पट्टयातील काही भाग व दक्षिण मुंबईतील काही भागांमध्ये माकडांचा वावर जास्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) त्यामुळे, सदर परिसरातील मनुष्य प्राण्यावर माकडांचे हल्ले होत असल्याचे प्रकार ही घडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) त्यामुळे, सदर प्रकाराची दखल घेऊन प्रशासन कोणती उपाययोजना करणार आहे,

(५) नसल्यास, त्याची काय कारणे आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०६-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

माकडांनी मनुष्यावर हल्ला केल्याची तक्रार वन विभागास प्राप्त झालेली नाही.

(४) माकडांच्या उपद्रवावर नियंत्रण करण्याकरीता खालीलप्रमाणे उपाययोजना केल्या जातात:-

• माकडांच्या उपद्रवांसबंधी व इतर तक्रारी नोंदविण्याकरीता वन विभागाने हॅलो फॉरेस्ट (१९२६) ही हेल्प लाईन सेवा सुरू करण्यात आली आहे.

• मुंबई वन परिक्षेत्र कार्यालयात २४/७ तास कार्यरत असलेला एक नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

• हॅलो फॉरेस्ट व मुंबई नियंत्रण कक्ष दुरध्वनी सेवेवर प्राप्त तक्रारींचे निवारण करण्याकरीता शीघ्र बचाव दलाची स्थापना करण्यात आली असून त्यांना वाहन व पिंजरे उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

• तक्रार प्राप्त होताच तात्काळ घटनास्थळी जाऊन माकडांना पिंज-यामध्ये जेरबंद केले जाते व जेरबंद केलेल्या माकडांना तात्काळ पशुवैद्यकीय अधिकरी यांचेकडून त्यांची शारीरिक तपासणी करून त्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र घेवून संबंधित प्राण्यांना त्यांचे नैसर्गिक अधिवासात मुक्त केले जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नरव्हाळ व दहयाणि (जि.धुळे) गावाच्या शिवारात बिबट्यांनी दोन गुरांचा बळी घेतल्याबाबत

**(१७) १०५७०३ (०७-०४-२०१८). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरव्हाळ व दहयाणे (जि.धुळे) गावाच्या शिवारात बिबटयाचा वावर असून त्यांनी दोन गुरे बळी घेतल्याचे माहे डिसेंबर, २०१७ अखेर निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मागील महिन्यात चाळीसगाव (जि.जळगाव) तालुक्यात वरखेडी परिसरात नरभक्षक बिबटयामुळे नागरीक भयभीत झाले असून याकडे वनविभाग दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी बिबटयापासून नागरीकांचे संरक्षण करण्याबाबत तसेच हल्ल्यात मृत्यू व नुकसान झालेल्या नुकसानग्रस्तांना कोणत्या स्वरुपाची शासनाने मदत केली आहे,

(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०५-२०१८) :** (१) हे अंशता खरे आहे.

धुळे तालुक्यातील नरव्हाळ व दहयाणे गावाच्या शिवारात बिबटयाने दिनांक २५.१२.२०१७ रोजी श्रीमती. विमल वसंत पवार, रा. दहयाणे, ता.धुळे यांची एक पारडी वर हल्ला केल्याचे निदर्शनास आले आहे. प्रस्तुत प्रकरणी संबंधित व्यक्तीस शासन निर्णयातील तरतुदीनुसार रु.१५००/- अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

चाळीसगाव वनक्षेत्रातील वरखेडे, सायगाव, उंबरखेड, पिंपळगाव म्हाळसा, दरेगाव, काकडणे, खामखेडा, तासमवाडी, देशमुखवाडी, टाकरखेडा, पिंपरखेड, मांदुर्णे, काकडणे या १३ गावातील परिसरात वावर असलेल्या उपद्रवी बिबटयाचा शोध घेण्याकरीता राज्यातील नाशिक, बुलढाणा, अमरावती, चंद्रपूर, जुन्नर, बोरीवली येथुन बिबट बेशुध्द करणारी पथके मागविण्यात आली होती. तसेच पिंजरे (Trap Cages), कॅमेरा स्ट्रॅप्स, बिबट्यास बेशुध्द करणारी पथके, गस्त पथके तैनात करण्यात आलेली होती. या कामी १३० वन अधिकारी, कर्मचारी तैनात करण्यात आले होते.

(३) होय,

बिबटयाचे हल्ल्यात मृत झालेल्या व्यक्तींच्या वारसांना शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रत्येकी रु.८ लक्ष अदा करण्यात आले असुन बिबट्याच्या हल्ल्यात जखमी झालेल्या व्यक्तींना एकुण रक्कम रु.३.४५ लक्ष अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ताडोबा उद्यानात गेलेल्या गावांचे पुनर्वसन करण्याबाबत.**

**(१८) १०६६०४ (३१-०३-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ताडोबा उद्यानात गेलेल्या गावांचे पुनर्वसन करण्याचे काम मागील १७ वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साडेचारशेहून अधिक कुटुंबियांना आजही ताडोबा प्रकल्पालगत वास्तव्य करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने ५ ऑगस्ट, २००० च्या शासन धोरणानुसार बाधित गावांचे पुनर्वसन लवकरात लवकर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०५-२०१८) :** (१), (२) व (३) राष्ट्रीय उद्यान/अभयारण्यातील गावंचे पूनर्वसन हे ऐच्छिक आहे. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाअंतर्गत अंधारी अभयारण्यातील ६ गावांपैकी बोटेझरी, जामणी, नवेगाव (रामदेगी) व कोळसा (भाग) या गावांचे पुनर्वसन प्रकल्पाबाहेर करण्यात आले आहे. तसेच पळसगाव (सिगंरु) या एका गावाचे पूनर्वसन करण्याची कार्यवाही सुरु आहे.

अंधारी अभयारण्यातील पुनर्वसनास शिल्लक असलेल्या गावांमध्ये पळसगाव (सिगंरु)-१४३, कोळसा (भाग)-५२ व रानतळोधी-२०७ असे एकूण ४०२ कुटुंब संख्या आहे.

(४) उप विभागीय अधिकारी (राजस्व), वरोरा तथा विशेष बंदोबस्त अधिकारी यांच्या दिनांक ०५ ऑगस्ट, २००० च्या आदेशानुसार बाधित गावांच्या पुनर्वसनाची प्रक्रिया सुरू आहे.

पळसगाव (सिंगरू) येथील प्रकल्पग्रस्त कुटुंबियांकरीता वरोरा परिक्षेत्रातील सालोरी कक्ष क्र.११ येथे नागरी सोयी-सुविधा व निवासस्थानाचे बांधकाम चालू आहे.

रानतळोधी गावातील कुटंबियांनी वरोरा परिक्षेत्रातील सालोरी राखीव कक्ष क्र.१४ बी येथील जागेची निवड केली असून पुनर्वसनाकरीता आवश्यक असलेल्या ३०५ हेक्टर क्षेत्राचा वनसंवर्धन अधिनियम, १९८० अंतर्गत वनक्षेत्र वळती करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात येत आहे.

कोळसा गावात सद्यस्थितीत ५२ कुटूंब पुनर्वसन करण्याकरीता शिल्लक असून त्यांच्याकडून पुनर्वसनाकरीता लागणा-या पर्यायी जागेची निवड करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील उद्योग व कामगार विभागा अंतर्गत आरागिरणी परवान्यांचे नियमबाहय नुतनीकरण करुन सदरील उद्योग धोकादायक ठरविले असल्याबाबत**

**(१९) १०६६२८ (०७-०४-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील उद्योग व कामगार विभागा अंतर्गत चार हजार आरागिरणी परवान्यांचे नियमबाहय नुतनीकरण करुन सदरील उद्योग धोकादायक ठरविले असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९८२ पासून आरागिणी परवान्यांची नुतनीकरणासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून तपासणी झालेली नसल्यामुळे तपासणीचे प्रति आरागिरणी तीन हजार रुपये शुल्क बुडविण्यास वनविभाग जबाबदार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही. तथापि अमरावती (प्रादेशिक) वनवृत्तांतर्गत अमरावती जिल्हयामध्ये एकुण १४५ नोंदणीकृत आरागिरण्या असून त्यापैकी १३९ आरागिरणींचे नुतनीकरण भारतीय वन अधिनियम, १९२७ चे अधिनियमांचे अंतर्गत महाराष्ट्र वन नियमावली, २०१४ मधील नियम ५३ (४) अन्वये व प्रशासकिय मार्गदर्शक सुचनेनुसार करण्यात आले आहे. तसेच उर्वरीत ६ आरागिरणी धारकांनी नियमानुसार आवश्यक दस्ताऐवज सादर न केल्यामुळे सदर ६ आरागिरणींचे नुतनीकरण करण्यात आले नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

आरागिरणी परवान्याचे नुतनीकरण वनविभागातर्फे शासनाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या नियमांतर्गत करण्यात येते. त्याकरीता लागणारे आवश्यक शुल्क आरागिरणी धारकांकडून वसूल करण्यात येते. आरागिरणी नुतनीकरण करताना प्रदूषण नियंत्रण मंडळाकडुन तपासणीबाबत प्रचलित नियमांमध्ये काही नमूद करण्यात आलेले नाही. त्यामुळे प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून तपासणी झालेली नसल्यामुळे तपासणीचे प्रति आरागिरणी तीन हजार रुपये शुल्क बुडविण्यास वनविभाग जबाबदार आहे, असे म्हणणे खरे नाही.

तथापि, याबाबत प्रादेशिक अधिकारी, प्रदूषण नियंत्रण मंडळ, अमरावती यांचेकडील प्राप्त माहिती नुसार अमरावती जिल्हयातील प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून संमत्तीपत्र न घेता सुरू असलेल्या १३४ आरागिरणींना कारणे दाखवा नोटीशी देण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी २३ आरागिरणींनी अर्ज सादर केले असुन, उर्वरीत १११ आरागिरणींना जल (प्रतिबंध आणि प्रदुषण नियंत्रण) कायदा, १९७४, हवा (प्रतिबंध आणि प्रदुषण नियंत्रण) कायदा, १९८१ तसेच टाकाऊ घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम, २०१६ अन्वये निर्देश देण्याचे काम प्रगतिपथावर असल्याबाबत प्रादेशिक अधिकारी, प्रदूषण नियंत्रण मंडळ, अमरावती यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात मागील ५ वर्षामध्ये रानटी जानवराच्या हल्यात २१७ नागरिक मृत्युमुखी पडल्याबाबत**

**(२०) १०७०२८ (३१-०३-२०१८). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील ५ वर्षामध्ये जंगली व रानटी जनावराच्या हल्ल्यात २१७ व्यक्ती मृत्युमुखी व २१७६ व्यक्तींना गंभीर दुखापत झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त हल्ल्यामध्ये बहुतांशी लोक शेतात काम करणारे कामगार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने व वनविभागाने वन्य जीवांच्या हल्ल्यापासून बचाव करण्याकरिता शेतकऱ्यांना व नागरिकांना प्रशिक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३१-०५-२०१८) :** (१) व (२) राज्यात सन २०१३-१४ ते २०१७-१८ पर्यंत वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मनुष्य मृत्युची २२८, मनुष्य अपंगत्वाची २३, मनुष्य गंभीर जखमीची ८८९ प्रकरणे निदर्शनास आली आहे. यामध्ये बहुतांश लोक शेतीमध्ये काम करणारे कामगार असतात.

(३) वन्यप्राण्यांच्या हल्ल्यापासून बचाव करण्याकरिता शेतकऱ्यांना / नागरिकांना खालीलप्रमाणे प्रशिक्षण / जनजागृती करण्यात येते.

१. परिक्षेत्र स्तरावर वन्यजीव सप्ताह, जागतिक वनदिन, पर्यावरण दिन, व्याघ्र दिन सारखे कार्यक्रमाच्या माध्यमातून वनाचे संरक्षण व मानव वन्यजीव संघर्ष टाळणेकरता गावकरी, शालेय विद्यार्थी व क्षेत्रीय कर्मचारी यांना मार्गदर्शन केले जाते.

२. कॅरिडोअर विकास कार्यक्रमांतर्गत ट्रॅक या अशासकीय संस्थेव्दारे गावामध्ये प्रशिक्षण घेऊन मानव वन्यजीव संघर्ष टाळण्याच्या अनुषंगाने गावकरी व क्षेत्रीय कर्मचारी यांना मानव वन्यजीव संघर्षाची कारणे, संघर्ष टाळणेसाठी तसेच संघर्षाचे वेळेस करावयाची वर्तणूक याबाबत प्रशिक्षण देण्यात येतात.

३. जंगलालगतचे गावात सभा घेऊन जंगलात अवैधरित्या व एकटे जाऊ नये अशी विनंती करण्यात येते. वन्यप्राण्यांच्या वावर असलेल्या ठिकाणी स्थानिकांना जाण्यास मज्जाव करण्यात येतो.

४. वन्यप्राण्यांपासून बचाव करणेसाठी ग्रामस्थांना/शेतकऱ्यांना ग्रामसभा भेटीव्दारे, भिंतीपत्रकाव्दारे, माहिती देण्यात येते. तसेच विशेष प्रकरणी दवंडी, प्रत्यक्ष ग्रामस्थांशी चर्चा, भेटीव्दारे, निसर्ग संवर्धन प्रशिक्षणाव्दारे माहिती पुरविली जाते.

५. ज्या भागात वाघाचे/बिबटयाचे अस्तित्व आहे त्या भागात सावधानतेचा इशारादर्शक पोस्टर्स/माहिती फलक लावण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीगोंदा व कर्जत (जि.अहमदनगर) येथील क्षेत्र माळढोक अभयारण्यासाठी आरक्षित करण्याचा निर्णय**

**(२१) १०७२३७ (३१-०३-२०१८). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा व कर्जत (जि.अहमदनगर) येथील क्षेत्र माळढोक अभयारण्यासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय शासनाने माहे नोव्हेंबर, २०१७ च्या शेवटच्या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाच्या अनुषंगाने एका राजकिय पक्षामार्फत क्षेत्र कमी करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाबाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनूसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०६-२०१८) :** (१) महाराष्ट्र शासनाने दिनांक ०९ मार्च, २०१६ रोजीच्या अधिसूचने अन्वये ३६६.७३ चौ.कि.मी. क्षेत्र पुनर्गठीत माळढोक पक्षी अभयारण्य म्हणून घोषित केले आहे. त्यामध्ये श्रीगोंदा तालुक्यातील १०४३०.०८ हेक्टर व कर्जत तालुक्यातील १४६३९.४१ हेक्टर क्षेत्राचा समावेश आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) महाराष्ट्र शासनाने दिनांक २७.०२.२०१२ च्या अधिसूचने अन्वये ११२९.२४ चौ.कि.मी. क्षेत्र माळढोक पक्षी अभयारण्य घोषित केले होते. वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ च्या तरतुदीं प्रमाणे उप विभागीय अधिकारी, कर्जत यांनी संबंधित क्षेत्रातील लोकांच्या हक्क व सवलतीबाबत चौकशी करुन अंतिम आदेश पारित केले. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने वन्यजीव (संरक्षण), अधिनियम १९७२ चे कलम २६(क) मधील पोटकलम-३ व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन दिनांक ०९ मार्च, २०१७ रोजीच्या अधिसूचने अन्वये ३६६.७३ चौ.कि.मी. क्षेत्र पुनर्गठीत माळढोक पक्षी अभयारण्य म्हणून घोषित केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्हयात जलयुक्त शिवार योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात झालेला गैरव्यवहार**

**(२२) १०७६६३ (०७-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयात जलयुक्त शिवार योजनेमध्ये मोठयाप्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ च्या दुस-या आठवडयात निदर्शनास आल्याने राज्यात सुरु असलेल्या जलयुक्त शिवार योजनेच्या कामामध्ये अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन दोषीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच संरक्षित सिचंनाची व्यवस्था मोठया प्रमाणावर वाढविण्यासाठी कालबध्द नियोजन जलआराखडा तयार करण्याबाबत कोणती उपायोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (३१-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत सन २०१६-१७ व सन २०१७-१८ मध्ये नियोजनानूसार जल आराखडा तयार करण्यात आलेला असून विविध यंत्रणेद्वारे कामे करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यात पाणीसाठा वाढविण्यासाठी तसेच भूगर्भातील पाणीपातळी वाढीसाठी जलयुक्त शिवार योजनेचा कृती आराखडयाबाबत**

**(२३) १०७८२१ (३१-०३-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यात पाण्याचा साठा वाढविण्यासाठी तसेच भूगर्भातील पाणी वाढीसाठी जलयुक्त शिवार योजनेचा कृती आराखडा तयार करण्यात येऊनही सदर योजनेस दिरंगाई होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलयुक्त शिवार योजनेचे काम जलदगतीने सुरु करण्यासाठी शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०१-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अजिंठा (जि.औरंगाबाद) वनक्षेत्रातील वन्यप्राण्यांना पाण्यासाठी बांधण्यात आलेले पाणवठे कोरडे असल्याबाबत**

**(२४) १०७८३० (३१-०३-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अजिंठा (जि.औरंगाबाद) येथे वन्यप्राण्यांच्या पाण्यासाठी लाखो रुपये खर्च करुन बांधण्यात आलेले अजिंठा वनक्षेत्रातील पाणवठे पूर्णपणे कोरडे असल्याने वन्यप्राणी पाण्यासाठी मानवी वस्त्याकडे जात असल्याने नागरीकांमध्ये भितीचे व चिंतेचे वातावरण निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन्य प्राण्यांना पिण्याच्या पाण्याची कायमस्वरुपी व्यवस्था होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३१-०५-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.
अजिंठा वनपरिक्षेत्रात ६ नैसर्गिक पाणवठे असुन १९ कृत्रिम पाणवठे आहेत. वन्यप्राण्यांना उन्हाळयात पाणी उपलब्ध करण्याच्या अनुषंगाने कृत्रिम पाणवठयांमध्ये टँकरव्दारे पाणी टाकण्यात येते.
माहे जानेवारी, २०१८ मध्ये वन्यप्राणी पाण्यासाठी मानवी वस्त्यांकडे येत असल्याने नागरीकांमध्ये भितीचे वातावरण पसरल्याची बाब निदर्शनास आली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तुमसर (जि.भंडारा) तालुक्यात गोबरवाही, नाकाडोंगरी, लेंडेझरी, गायमुख, आंबागड या परिसरातील वनराईमध्ये वनविभागाच्या दुहेरी धोरणामुळे वृक्षतोडीच्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत**

**(२५) १०८०७४ (०७-०४-२०१८). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तुमसर (जि.भंडारा) तालुक्यात गोबरवाही, नाकाडोंगरी, लेंडेझरी, गायमुख, आंबागड या परिसरातील वनराईमध्ये वनविभागाच्या दुहेरी धोरणामुळे वृक्षतोडीच्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०५-२०१८) :** (१) तुमसर (जि.भंडारा) तालुक्यात गोवरवाही, नाकाडोंगरी, लेंडेझरी, गायमुख, आंबागड या परिसरात दिनांक १३.१.२०१८ रोजी वा त्या दरम्यान वृक्षतोडीच्या प्रमाणात वाढ झाल्याचा प्रकार आढळून आलेला नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य शासनाने जायकवाडी धरणाच्या जलाशय परिसरात पक्षी अभयारण्यात "इको सेस्नेटिव्ह झोन" लागू करुन जाचक निर्बंध मच्छिमारांवर लावण्यात आल्याबाबत**

**(२६) १०८१७५ (३१-०३-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जायकवाडी धरणाच्या जलाशय परिसरात पक्षी अभयारण्यात 'इको सेस्नेटिव्ह झोन' लागू करुन जाचक निर्बंध मच्छिमारांवर लावण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जाचक अटीमुळे येथील मच्छिमारांचे व्यवसाय संपुष्टात आल्याने उक्त मच्छिमार बेरोजगार झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदरहू मच्छिमारांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०५-२०१८) :** (१) केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल, मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दिनांक १२.०७.२०१७ रोजी जायकवाडी पक्षी अभयारण्याची पर्यावरण संवेदनशील क्षेत्राची (ESZ) अंतिम अधिसूचना जारी केली आहे. सदर अधिसूचनेनुसार पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात (ESZ) मासेमारी हा उपक्रम नियंत्रित असून प्रतिबंधित नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उस्मानाबाद जिल्हयातील जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत झालेल्या कामांचे मुल्यमापन करणेबाबत

**(२७) १०८२२२ (०४-०४-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्हयामध्ये जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत गेल्या अडीच वर्षात कामे पूर्ण झालेली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन निर्णयाप्रमाणे सदरील कामांचे समवर्ती मुल्यमापन व त्रयस्त यंत्रणेमार्फत मुल्यमापन होणे आवश्यक आहे काय,
(३) असल्यास, मुल्यमापन करण्यासंबंधी वारंवार विनंती करुनही मुल्यमापन न करण्याचे कारणे काय आहेत,
(४) असल्यास, वेळोवेळी पत्रव्यवहार करुन देखील मुल्यमापन करण्यास दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (३१-०५-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) उस्मानाबाद जिल्हयात जलयुक्त शिवार अभियान सन २०१५-१६ मधील गाव आराखड्यातील एकूण २१०२५ कामे १०० % पूर्ण झाली आहेत. या सर्व १०० % कामांची त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी व समवर्ती मूल्यमापन करण्यात आले आहे.

तसेच सन २०१६-१७ मध्ये गाव आराखड्यातील १६७९५ कामापैकी १६६९५ कामे पूर्ण झालेली आहेत. पूर्ण झालेल्या कामापैकी ७५.८१ % (१२६५६) कामांची तपासणी त्रयस्थ संस्थांमार्फत करण्यात आली असून ८४.८३% (१४१८३) इतक्या कामांचे समवर्ती मूल्यांकन पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित कामांची तपासणी व मूल्यांकनाचे काम सुरू आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कुऱ्हा (ता.रिसोड, जि.वाशिम) येथे एका वानराला ठार मारल्याचा व्हिडीओ चित्रण केल्याबाबत**

**(२८) १०८४३१ (०७-०४-२०१८). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कुऱ्हा, (ता.रिसोड, जि.वाशिम) येथे काही व्यक्तींनी एका वानराला निर्घुणपणे काठीने बेदम मारुन त्याला झाडाला लटकवून ठार मारल्याचा व्हिडीओ चित्रण करुन ते प्रसारमाध्यमांवर टाकल्याची बाब उघड झाल्यानंतर, हे कृत्य करणाऱ्या तिघांना वन विभागाने ताब्यात घेतल्याची बाब दिनांक १७ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकाराबाबत सामान्य जनतेत प्रक्षोभ निर्माण होऊन हे कृत्य करणाऱ्या पवन बांगर व अन्य व्यक्तींविरुध्द वन्यजीव (संरक्षण) किंवा अन्य कायद्यानुसार तातडीने कारवाई करण्यात यावी अशी होत असलेली मागणी लक्षात घेऊन, वन विभागाने या व्यक्तींविरुध्द कोणत्या कलमाखाली गुन्हा नोंदवून त्यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर दोषी व्यक्तींविरुध्द तातडीने कारवाई करण्यात आली नसल्यास, कारवाईस हेतूत: विलंब करणाऱ्या वन विभागाच्या संबंधीत बेजबाबदार अधिकाऱ्यांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) उपरोक्त प्रकरणी आरोपींविरुध्द भारतीय वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम २ (१६), ९, २६ (४), ३९ (१) (ड), ३९ (३) (क) R/W ५१, तसेच भारतीय दंडसंहिता १८६० चे कलम ४२८, ४२९ व Prevention of Cruelty to Animals Act-१९६० चे कलम ३, ९ R/W १८ अन्वये गुन्हा नोंदवून दिनांक १७.१२.२०१७ रोजी श्री.पवन कडुजी बांगर व इतर दोघांना अटक करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुलुंड (मुंबई) पूर्वेकडील जयहिंद कॉलनी परिसरातील बाबुवाडी व नानेपाडा भागात बिबट्याच्या हल्ल्यात ५ व्यक्ती जखमी झाल्याबाबत**

**(२९) १०८६२० (३१-०३-२०१८). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित झनक (रिसोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा),**

**श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलुंड (मुंबई) पूर्वेकडील जयहिंद कॉलनी परिसरातील बाबुवाडी व नानेपाडा भागात पहाटे ५ वा.एका बिबटयाने विविध व्यक्तीवर व काही घरांमध्ये घुसून केलेल्या हल्ल्यात ५ व्यक्ती जखमी झाल्याची बाब दिनांक १३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पहाटे पाच ते दुपारी एक या सात ते आठ तासांत बिबटयाने केलेल्या हल्ल्यात किमान ५ ते ६ नागरिक जखमी झाले असून या जखमींवर विविध रुग्णालयात केलेले उपचार, त्याचा वैद्यकीय खर्च तसेच नागरिकांच्या घराचे व अन्य वस्तूंचे झालेले नुकसान, ही सर्व नुकसान भरपाई व औषधोपचाराचा खर्च शासनाने पंचनामे करुन संबंधीत नागरिकांना दिला आहे काय,

(३) नसल्यास, केंद्र व राज्य शासनाच्या प्रचलित नवीन नियमानुसार संबंधीत सर्व नागरिकांना नुकसान भरपाई तातडीने मंजूर करुन न देणाऱ्या वन विभागाच्या संबंधीत अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०५-२०१८) :** (१) व (२) ठाणे वनविभागातील मुलुंड (मुंबई) पूर्वेकडील जयहिंद कॉलनी परिसरातील बाबूवाडी व नानेपाडा भागात पहाटे ५ वाजता एका बिबटयाने विविध व्यक्ती व घरांमध्ये घुसून केलेल्या हल्ल्यात ६ व्यक्ती जखमी झाल्याची बाब दि. १३ जानेवारी, २०१८ रोजी निदर्शनास आली आहे. प्रस्तुत प्रकरणी हल्ल्यातील सर्व किरकोळ जखमी व्यक्तींना शासन निर्णयातील तरतुदी नुसार प्रत्येकी रक्कम रु.१५०००/- आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे कवठा (ता.सावनेर, जि.नागपूर) येथील खापा वनपरीक्षेत्रातील अवैध वृक्षतोड**

**(३०) १०८६६२ (०७-०४-२०१८). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कवठा (ता.सावनेर, जि.नागपूर) येथील खापा वनपरीक्षेत्रातील, झुडपी जंगल, खसरा नं. ३२२, आराजी १०० एकरातील झाडे, रोहण, चार, टेंभुण, धावडा इत्यादी प्रकारच्या झाडाची कंत्राटदाराशी संगनमत करून सहा. वनसंरक्षक, नागपूर यांच्या सहकार्याने अधिकारी

कर्मचाऱ्यांनी सुमारे २५०० झाडाची अवैध तोड केल्याचे व सदर प्रकरणी मुख्य सुत्रधार सहा. वनसंरक्षक यांना निलंबित न करता कनिष्ठ दर्जाचे सावनेर खापा येथील वनपरीक्षेत्र अधिकारी, सहायक वनपरीक्षेत्र अधिकारी व वनपाल यांनाच निलंबित केल्याने कारवाई संशयास्पद असल्याची लेखी तक्रार लोकप्रतिनिधीनी मा.वने मंत्री, अखिल भारतीय पत्रकार संघ, नागपुर व प्रधान मुख्य वनसंरक्षण, नागपुर यांना दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २५०० झाडाची अवैध तोड केल्याप्रकरणी मुख्य सुत्रधार सहायक वनसंरक्षक, नागपूर यांचेविरूद्ध शासनाने चौकशी केलेली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार दोषी अधिकाऱ्यांच्या संगनमताने २५०० झाडाच्या अवैध तोड प्रकरणी झालेल्या वनसंपदेच्या नुकसान भरपाईची वसुली यांच्या वेतनातून केली आहे काय वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०५-२०१८) :** (१) प्रश्नातील नमूद स्वरुपाची दि.२०.९.२०१७ अन्वये तक्रार मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) नागपूर यांना प्राप्त झाली आहे.

(२), (३) व (४) माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये नागपूर वनविभागातील खापा वनपरिक्षेत्रात मौजे कवठा अंतर्गत सर्व्हे क्र.३२२ मध्ये भारतीय वन अधिनियम, १९२७ कलम ४ अंतर्गत अधिसुचित क्षेत्रात (मुळतः झुडपी जंगल क्षेत्र) अवैध वृक्षतोड झाल्याबाबतचे प्रकरण निदर्शनास आले होते. त्याअनुषंगाने माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये केलेल्या चौकशीनुसार २५०० झाडांची अवैध वृक्षतोड झाली नसून ६७६ वृक्षांची अवैध तोड झाल्याचे निदर्शनास आले. श्री.विनायक एस उमाळे, सहाय्यक वनसंरक्षक हे सध्या उपविभागीय वन अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. या प्रकरणी श्री.विनायक एस उमाळे, सहाय्यक वनसंरक्षक यांचा या वृक्षतोडीबाबत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग असल्याचे निदर्शनास आले नसून त्यांनी उक्त अवैध वृक्षतोड प्रकरणी चौकशी करुन एकूण ८ इसमांना अटक करुन मा.न्यायालयात प्रस्तुत केले आहे. या प्रकरणी संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी, खापा यांना निलंबित करण्यात आले असून त्यांचेविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई सुरु करण्यात आली आहे. प्रकरणातील संबंधित २ वनरक्षक व १ वनमजूर यांनी वनसंरक्षणाकडे दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आल्यामुळे त्यांना निलंबित करुन त्यांचेविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई सुरु करण्यात येत आहे.

---

**पाटण (जि.सातारा) तालुक्यातील सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात अनधिकृत उभारलेल्या पवनचक्की व रिसोर्ट यांचेकडून वसूल करण्यात आलेल्या दंडाच्या रक्कमेच्या विनीयोगाबाबत**

**(३१) १०८७७८ (३१-०३-२०१८). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण (जि.सातारा) तालुक्यातील सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रात अनाधिकृत उभारण्यात आलेल्या पवनचक्की व रिसोर्ट यांचेकडून दंड स्वरुपातील बहूतांशी रक्कम वसूल

करण्यात आली आहे तर अजुनही सदरच्या दंडाची थोडीफार रक्कम वसूल करणे बाकी आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या दंडाव्यतिरिक्तही पाटण तालुक्यातील पवनचक्की कंपन्या व रिसोर्ट मालकांकडून सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाने काही रक्कमा वसूल केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास वसूल केलेल्या दंडाच्या रक्कमेचा विनीयोग करताना काही मार्गदर्शक तत्वे तयार करण्यात आली असून या मार्गदर्शक तत्वानुसारच सदरच्या रक्कमेचा या प्रकल्पाने विनीयोग केला आहे वा कसे याचा थोडक्यात सविस्तर तपशील काय आहे,
(४) असल्यास, या सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात अनधिकृत असणारी ९ रिसोर्ट तसेच २१५ पवनचक्की ह्या व्यतिरीक्त नव्याने घडलेली बांधकाम तसेच उभारलेल्या पवनचक्क्या यांच्याकडून या प्रकल्पाने दंड वसूल केला आहे काय,
(५) नसल्यास पुर्वीच्या दंडातील रक्कम वसूल करण्यात तसेच नव्याने बांधण्यात आलेल्या बांधकामाचे व पवनचक्क्याकडून दंड वसूल करणेबाबत राज्य शासनाने कोणता निर्णय घेतला आहे त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३१-०५-२०१८) :** (१) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे व केंद्रीय सशक्तता समिती यांचे शिफारशीनुसार कोयना अभयारण्यातील विविध पवन चक्क्या, रिसॉर्टचे प्रकल्प यंत्रणांना नक्त वर्तमान मुल्य (N.P.V.) ची रक्कम सह्याद्री व्याघ्र राखीव क्षेत्राचे व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठाणकडे जमा करावयाची आहे. सद्यस्थितीत ६० पैकी ५२ प्रकल्प यंत्रणांनी रु.२९.७५ कोटी पैकी रु.२८.१० कोटी इतकी रक्कम सह्याद्री व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठाणकडे जमा केलेली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे व केंद्रीय सशक्तता समिती यांचे शिफारशीनुसार नक्त वर्तमान मुल्य (N.P.V.) ची रक्कम सह्याद्री व्याघ्र राखीव क्षेत्राचे व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठाणकडे जमा करुन, सह्याद्री व्याघ्र राखीव क्षेत्राचे संवर्धन, संरक्षण व मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी त्याचा विनियोग करण्यात येत आहे.
(४) सहयाद्री व्याघ्र राखीव क्षेत्रांतर्गत कोयना अभयारण्यात अनधिकृत २०६ पवन चक्क्या व ९ रिसॉर्टच्या बांधकामाव्यतिरिक्त नव्याने पवन चक्क्या / रिसॉर्ट उभारण्यात आलेले नाही. तथापि, नव्याने निवासी बांधकामे करण्यात आली आहे. सदर बांधकामाबाबत संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे.
(५) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे व केंद्रीय सशक्तता समिती यांचे शिफारशीनुसार नक्त वर्तमान मुल्य (N.P.V.) न भरणाऱ्या पवनचक्क्या व रिसॉर्ट बंद करण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्हयातील जलयुक्त शिवार अभियानांतर्गत कामांबाबत**

**(३२) १०८९९१ (०७-०४-२०१८). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयात दिनांक १ जानेवारी, २०१७ ते ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत जलयुक्त शिवार अभियानांतर्गत किती कामे हाती घेण्यात आली होती,

(२) असल्यास, त्यापैकी जलयुक्त शिवार योजनेची किती कामे पूर्ण करण्यात आली आहेत,

(३) असल्यास, त्यावर आतापर्यंत किती खर्च करण्यात आला आहे,

(४) असल्यास, जलयुक्त शिवार अभियानांतर्गत जिल्हयात किती हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे ?

**प्रा. राम शिंदे (३१-०५-२०१८) :** (१) सांगली जिल्हयात दि.०१ जानेवारी, २०१७ ते ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत जलयुक्त शिवार अंतर्गत ५०१८ कामे हाती घेण्यात आली होती.

(२) जलयुक्त शिवार योजनेची या कालावधीत एकूण ४६३३ कामे पूर्ण झाली आहेत.

(३) आतापर्यंत रू.८२.४० कोटी खर्च करण्यात आला आहे.

(४) जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत झालेल्या कामांमुळे अंदाजे ९३६०.२९ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे.

---

**घाटबोरी (ता.मेहकर, जि.बुलढाणा) वनपरिक्षेत्रातील वन विभागाच्या निंबा बिट मधील मळी शिवारात बिबळया, रोही मृत अवस्थेत आढळल्याबाबत**

**(३३) १०९४९२ (३१-०३-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटबोरी (ता.मेहकर, जि.बुलढाणा) वनपरिक्षेत्रातील वन विभागाच्या निंबा बिट मधील मळी शिवारात गट नं.१०५ मधील शेतात दिनांक १६ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास बिबळया, रोही मृत अवस्थेत आढळल्याप्रकरणी वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) दिनांक १६.०७.२०१७ रोजी निंबा बिटातील मळी शिवारात बिबट व रोही मृत अवस्थेत आढळून आले. बिबट व रोही यांचा मृत्यू मळी शिवाराच्या नाल्यातील पाण्यामध्ये विद्युत

प्रवाह सोडल्यामुळे झाला आहे. प्रस्तुत प्रकरणी श्री.सुरेश प्रल्हाद लोखंडे व श्री.किशोर आश्रु गाढवे या दोन आरोपींना अटक करण्यात आली असुन सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ करण्यात आले आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

### लोणार (जि.बुलढाणा) तालुक्यातील देऊळगाव कुंडपाळ शिवारात एका शेतकऱ्यांच्या जनावरांवर बिबट्याने हल्ला करुन ठार केल्याची घटना

**(३४) १०९४९९ (०७-०४-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोणार (जि.बुलढाणा) तालुक्यातील देऊळगाव कुंडपाळ शिवारात एका शेतकऱ्यांच्या जनावरांवर बिबट्याने हल्ला करुन ठार केल्याची घटना दिनांक १३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार शेतकऱ्यांच्या कुटूंबियांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०५-२०१८) :** (१) श्री.श्रीराम विष्णु उरदुखे, रा.देऊगाव कुंडपाळ यांच्या मालकीचे पाळीव प्राण्यावर दिनांक १३.०१.२०१८ रोजी बिबट या वन्यप्राण्याने हल्ला करुन ठार केल्याची घटना निदर्शनास आली आहे.
(२) व (३) उपरोक्त प्रकरणी संबंधित व्यक्तीस प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार रु. १५,०००/- नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### इगतपूरी (जि.नाशिक) तालुक्यातील नांदगाव-अस्वली येथे रस्त्यांवरुन जाणाऱ्या प्रवाश्यांवर बिबट्याने हल्ला केल्याबाबत

**(३५) १०९५२७ (०७-०४-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इगतपूरी (जि.नाशिक) तालुक्याच्या पूर्व भागात अस्वली स्टेशन परिसरात नांदगाव-अस्वली रस्त्यावरुन प्रवास करणाऱ्या ज्ञानेश्वर जमदाडे व किसन जमदडे, रा.आवळी, (ता.इगतपूरी) यांच्यावर बिबटयाने हल्ला केल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरात बिबटयांच्या हल्ल्यामुळे ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बिबटे पकडण्याबाबत व नुकसानग्रस्तांना भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०५-२०१८) :** (१) दिनांक ०७.०१.२०१८ रोजी मौजे नांदगाव शिवारात असलेल्या दारणा नदिवरील पुलाजवळून श्री. ज्ञानेश्वर जमदाडे व श्री. किसन जमदाडे मोटर सायकलने जात असताना रस्ता ओलांडण्याचा प्रयत्न करत असलेल्या बिबट्यासोबत धडक झाली असल्याचे निदर्शनास आले आहे. धडक बसताच सदर बिबट रस्ता ओलांडून जंगलात निघून गेला. धडक बसल्याने सदर दोन्ही व्यक्ती खाली पडल्यामुळे किरकोळ जखमी झालेले आहेत.
(२) व (३) हे खरे नाही.
उपरोक्त प्रकरणी दोन्ही जखमी व्यक्तींना उपरचारासाठी जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे दाखल करण्यात आलेले असून त्यांनी कोणत्याही नुकसान भरपाईची मागणी केलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्हयातील जलयुक्त शिवार योजनेंतर्गत सिमेंट बंधाऱ्याच्या कामांसाठी केलेली निधीची मागणी

**(३६) ११०५३१ (०४-०४-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हयातील जलयुक्त शिवार योजनेंतर्गत सन २०१६-२०१७ मध्ये जलसंधारण विभागाने सिमेंट बंधाऱ्याच्या कामांसाठी १२ कोटी ९६ लाख रुपयांची मागणी जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कामासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे काय,
(३) नसल्यास, त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०१-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) मृद व जलसंधारण विभाग शासन निर्णय दि.७/६/२०१७ नूसार सोलापूर जिल्हयातील जलयुक्त शिवार अभियानाकरिता रू.२५.१७ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे. त्यानूसार जिल्हास्तरावरून सन २०१६-१७ मधील पूर्ण झालेल्या व प्रगतीपथावरील कामांची देयके अदा करण्यासाठी कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, सोलापूर यांना रू.१३.१० कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पैनगंगा (जि.यवतमाळ) अभयारण्यातील रस्त्यासाठी निधी मिळणेबाबत**

**(३७) ११०५४५ (१०-०४-२०१८). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैनगंगा (जि.यवतमाळ) अभयारण्यातील रस्त्यासाठी विशेष बाब म्हणून निधी मिळणेबाबत दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजी सचिव (वने) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत कोणकोणत्या बाबीसंदर्भात चर्चा करण्यात आली आहे,

(२) असल्यास, या बैठकीत कोणकोणते निर्णय घेण्यात आले आहे,

(३) असल्यास, त्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०५-२०१८) :** (१), (२) व (३) पैनगंगा अभयारण्यातील नागरिकांना तालुक्याच्या ठिकाणी येण्यासाठी रस्त्याची सोय नसल्यामुळे नागरिकांना तसेच रुग्णांना तालुक्याला उपचारासाठी येण्यासाठी अभयारण्यातील अस्तित्वात असलेल्या रस्त्यांची दुरूस्ती व या कामाकरिता निधी मिळणेबाबत दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजी सचिव (वने) यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीत चर्चा करण्यात आली.

पैनगंगा अभयारण्यामध्ये अस्तित्वात असलेल्या डांबरी रस्त्याचे डांबरीकरण हे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येत असल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने अभयारण्यातील अस्तित्वात असलेल्या डांबरी रस्त्याचे दुरूस्ती/डांबरीकरण तसेच कच्चा रस्त्यांची दुरूस्ती करण्याबाबत विहित प्रपत्रात प्रस्ताव तयार करुन विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), पांढरकवडा यांचेकडे सादर करणे. तसेच विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), पांढरकवडा यांनी उक्त प्रकरणी अस्तित्वात असलेल्या रस्ता दुरूस्तीचे प्रस्तावाबाबत विहित मुदतीत प्रस्ताव मान्यतेबाबत नियमानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. पैनगंगा अभ्यारण्यातील रस्त्याचे दुरुस्तीकरिता लागणारा निधीच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाला त्यांचे अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्याचे निर्देश देण्यात आले.

---

**नांदेड जिल्हयातील तामसा जंगलातील फिरत्या भरारी पथकाबाबत**

**(३८) ११०५४६ (३१-०३-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील तामसा जंगलातील राखीव वनाचे रक्षण व्हावे, अवैधरित्या होणारी जंगलतोड थांबवून लाकूड तस्करांवर आळा बसावा, वन खात्याच्या विनापरवानगीने चालू असलेल्या लाकडाच्या गैरव्यवहार थांबवण्यासाठी वन खात्याला एक विशिष्ट फिरत्या भरारी पथकाची जोड देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त फिरते भरारी पथकाने गेल्या दोन वर्षात एकही कारवाई केली नसल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वन खात्याने फिरते भरारी पथकाची निर्मिती करण्यामागची कारणे काय आहेत तसेच याबाबत शासनाने पाहणी करुन चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) तदनुसार शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

तामसा वनक्षेत्रात फिरते पथक, भोकर यांनी मागील २ वर्षात केलेल्या कारवाईचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | नोंदवलेली वनगुन्हे (गुन्हा क्रमांक) | चोरटी तुट उघडकीस आलेल्या बुडाच्या आधारे अंदाजे घनमीटर | वृक्षतोड संख्या | किंमत (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०१६-१७ | ७/२०१६ | ०.४५८ | २२ | १६५४ |
| २ | २०१६-१७ | २०/२०१६ | ०.२५६ | १० | ७७४ |
| ३ | २०१७-१८ | २५/२०१७ | ०.६९२ | २४ | १४८२ |
| ४ | २०१७-१८ | २३/२०१७ | ०.८१३ | २३ | २७९१ |

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जलयुक्त शिवार योजनेतंर्गत मातीच्या कामासाठी मजूर उपलब्ध होत नसल्याने शासनाने जलसमृध्दी यंत्रसामग्री व्याज अर्थसहाय योजना सुरु केल्याबाबत

**(३९) ११०६९१ (०४-०४-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जलयुक्त शिवार योजनेतंर्गत मातीच्या कामासाठी मजूर उपलब्ध होत नसल्याने शासनाने जलसमृध्दी यंत्रसामग्री व्याज अर्थसहाय योजना माहे जानेवारी, २०१८ पासून सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेअंतर्गत कोणकोणत्या संस्थाना कर्ज उपलब्ध करुन देण्यात येणार आहे,
(३) असल्यास, कोल्हापूर जिल्हयात या योजनेअंतर्गत किती अर्ज दाखल झाले व किती संस्थांना कर्ज उपलब्ध करुन देण्यात आले आहे ?

**प्रा. राम शिंदे (३१-०५-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) सदर योजनेंतर्गत शासनाकडून कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार नसून पात्र अर्जदारांना वित्तीय संस्थेने उत्खनन यंत्रसामुग्री खरेदी करीता कर्ज मंजूर केल्यास या कर्जावरील कमाल व्याज परतावा रू.५.९० लाख शासनाद्वारे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मृद व जलसंधारण विभाग शासन निर्णय दि.२/१/२०१८ अन्वये खालील घटकांना योजनेप्रमाणे

कर्जावरील व्याजाचा लाभ मंजूर करण्यात येणार आहे : १) सुशिक्षीत बेरोजगार, २) शेतकरी उत्पादक, ३) बेरोजगारांची सहकारी संस्था, ४) नोंदणीकृत गटशेती व ५) विविध कार्यकारी सहकारी संस्था.

(३) कोल्हापूर जिल्हयात सदर योजनेंतर्गत एकूण २७३ अर्ज प्राप्त झाले आहेत. प्राप्त अर्जांवर शासन निर्णयानूसार वित्तीय संस्थाकडून मंजूर करण्यात आलेल्या अर्जांचे कागदपत्रांची छाननी सुरू आहे.

---

**औरंगाबाद जिल्हयातील कायगाव परिसरातील धनगरपट्टी शिवारात बिबटयाच्या हल्ल्यात शेळ्यांचा झालेला मृत्यू**

**(४०) ११०७२० (१०-०४-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील कायगाव परिसरातील धनगरपट्टी शिवारात एका बिबटयाच्या हल्ल्यात ३ शेळया मृत झाल्याची घटना दिनांक २५ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनविभागाच्या दुर्लक्षामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर बिबटयाला पकडण्यासोबतच त्याच्या हल्ल्यात मृत पावलेल्या पशुधनाच्या मालकांना तातडीने नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०५-२०१८) :** (१) वैजापूर वनक्षेत्रांतर्गत वाडगाव ता. गंगापुर परिसरात दिनांक १४.११.२०१७ रोजी श्री. कादर रज्जाक पठाण यांच्या मालकीच्या दोन शेळ्या व एक बोकड, तडस या वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात ठार झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

उपरोक्त प्रकरणामध्ये संबंधित नुकसान ग्रस्त व्यक्तीस प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार रु. १५,०००/- नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राळेगांव (जि.यवतमाळ) तालुक्यात नरभक्षक वाघांनी ९ व्यक्तींचा बळी घेतल्याबाबत**

**(४१) ११२५९७ (१०-०४-२०१८). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राळेगांव (जि.यवतमाळ) तालुक्यातील १८ गावामध्ये जवळपास वर्षभरापासुन नरभक्षक वाघाने ९ व्यक्तींचा बळी घेतल्याचे दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नरभक्षक वाघाला जेरबंद करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.

राळेगाव तालुक्यातील पांढरकवडा प्रादेशिक वन विभाग व वन विकास महामंडाळाच्या कार्यक्षेत्रामध्ये माहे जून, २०१६ ते ९ डिसेंबर, २०१७ पर्यंत ९ व्यक्तींचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झालेला आहे. सदर सर्व प्रकरणातील मृत व्यक्तीच्या वारसांना प्रचलित शासन निर्णयानुसार रु.८ लक्ष अर्थसहाय्य अदा करण्यात आलेले आहे.

(२) नरभक्षक वाघाला जेरबंद करण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

१. नरभक्षक वाघाला जेरबंद करण्याकरिता वन्यजीव तज्ञ, पशुवैज्ञकिय अधिकारी, विशेष व्याघ्र संरक्षण दल व वन विभागाचे अधिकारी/कर्मचारी यांची विशेष कृती दल गठीत करण्यात आले आहे.

२. यवतमाळ व मोहदा परिक्षेत्रातील एफडीसीएम लि. चे जंगल क्षेत्रामध्ये वाघाचा वावर असलेल्या भागात ट्रॅप कॅमेरे, ट्रॅप केज लावण्यात आले आहे.

३. मौजा सराटी, लोणी, बोराटी, व सावरखेडा या संवेदनशिल गावामधून ग्रामस्थांच्या मदतीने वाघाची हालचाली ची माहिती घेणे व वाघाची हालचाली टिपणे व त्याप्रमाणे अधिकारी व कर्मचारी यांना वाघाच्या हालचालीची माहिती पुरविणे तसेच वनक्षेत्र आणि शेती सिमेलगतच्या प्रभावतीत क्षेत्रात गस्त करण्यात येत आहे.

४. संवेदशील क्षेत्रामध्ये विशेष पथके तयार करण्यात आली असून त्यांच्यामार्फत दिवस रात्र गस्त करण्यात येते. तसेच सदर वाघांना जेरबंद करण्याकरीता हत्तीची मदतसुध्दा घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## टिटवी (ता.लोणार, जि.बुलढाणा) शहरात बिबटयाचा आऊटलेटमध्ये मृतदेह आढळल्याप्रकरणी नेमलेल्या वन विभागाच्या चौकशी पथकाचा अहवाल

**(४२) ११२७४६ (३१-०३-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टिटवी शहरात (ता.लोणार, जि.बुलढाणा) दोन वर्षे वयाच्या बिबटयाचा आऊटलेटमध्ये दिनांक २० जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास मृतदेह आढळल्याप्रकरणी नेमलेल्या वन विभागाच्या चौकशी पथकाने अहवाल शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालात काय आढळून आले,

(३) असल्यास, अहवालानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०५-२०१८) :** (१), (२) व (३) दिनांक १९.०७.२०१७ रोजी बुलढाणा वनविभागांतर्गत मेहकर वनपरिक्षेत्रातील खाजगी सर्वे क्र.४३४ मध्ये टिटवी धरणाच्या उजव्या कालव्यात असलेल्या विहीरीमध्ये १ बिबटा मृत अवस्थेत आढळून आला आहे.

प्रस्तुत प्रकरणी वनगुन्हा नोंदविण्यात आला असून शवविच्छेदन अहवालानुसार बिबट्याचा मृत्यु ब्रेन हॅमरेजने झाला आहे. बिबट्याचे आवश्यक अंग (व्हीसेरा) पुढील तपासाकरिता उपसंचालक, प्रादेशिक न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, औरंगाबाद येथे पाठविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सूलतानपूर (जि.बुलढाणा) परिसरात जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत सुरु असलेल्या दोन बंधाऱ्यांची कामे गैरप्रकार झाल्याने बंद असल्याबाबत

**(४३) ११२९०३ (१०-०४-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सूलतानपूर (जि.बुलढाणा) परिसरात जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत सुरु असलेल्या दोन बंधा-यांची कामे गैरप्रकार झाल्याच्या कारणाने माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान बंद पाडली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**प्रा. राम शिंदे (२८-०५-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) याबाबत तत्कालिन कार्यकारी अभियंता, जि.प.सिंचन विभाग, बुलढाणा यांनी तक्रारदारासमवेत बंधाऱ्यांची पाहणी केलेली आहे. त्यानूसार सदर कामे अंदाजपत्रकाप्रमाणे योग्य असून त्याठिकाणी गैरप्रकार झाल्याचे आढळून आलेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोरपना (जि.चंद्रपूर) तालुक्यात आदिवासी बहुल शेतकऱ्यांचे जंगली प्राण्यामुळे शेतीचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांना भरपाई देण्याबाबत

**(४४) ११३०१९ (३१-०३-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरपना तालुका (जि.चंद्रपूर) आदिवासी बहुल असून बहुतांश आदिवासी शेतकरी गोरगरीब असून जंगलाच्या पायथ्याशी शेती असल्यामुळे येथे जंगली प्राण्यामुळे शेतीचे नुकसान होत असल्याने शेतीच्या नुकसानीचे पैसे त्वरित देण्याची मागणी स्थानिक पदाधिकारी यांनी मा.मुख्यमंत्री, मा.वने मंत्री यांच्याकडे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) कोरपना तालुक्यात जून, २०१७ ते एप्रिल, २०१८ या कालावधीत वन्यप्राण्यांव्दारे शेतपीक नुकसानीच्या ६४४ प्रकरणे निदर्शनास आली असून प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधितांना रु. १९.४५,२९६ /- इतके अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### औरंगाबाद जिल्हयात जलयुक्त शिवार योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(४५) ११३५२३ (१०-०४-२०१८). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्हयात सन २०१६-१७ मध्ये जलयुक्त शिवार योजनेतून निवडलेल्या गावातील दुरुस्तीचे कामांचे ३ लाख रुपये कमी करून सहकारी संस्थांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर १५० कामांचे २०० तुकडे करून १९० कामे मजूर सहकारी संस्थाना व १० कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना देण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१६-१७ मध्ये दुरूस्ती आणि सिमेंट बंधाऱ्यांसाठी २५ कोटी ४१ लाख रुपये पूर्ण झालेल्या कामासाठी वापरण्यासाठी आदेश असताना सदर रुपये सन २०१५ -१६ मध्ये केलेल्या कामासाठी वापरण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय त्यानुसार दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (३१-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

जलयुक्त शिवार आराखडा सन २०१६-१७ अंतर्गत २११ दुरूस्ती कामांना प्रशासकिय मान्यता मिळाली असून त्यापैकी ३२ कामे ई-निविदा पद्धतीने झाली आहेत. २११ कामापैकी ६ कामे दुरुस्ती मुळे रद्द केली असून १० कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना देण्यात आली

आहेत. उर्वरित १६३ कामे जिल्हा उप निबंधक यांचे शिफारशीनूसार मजुर सहकारी संस्थेस देण्यात आली आहेत.

(३) अंशत: खरे आहे.

जलयुक्त शिवार अभियान सन २०१६-१७ मध्ये शासनाने उपलब्ध करून दिलेल्या रू.२५.४१ कोटी निधीमधून रू.९.६३ कोटी निधी जलयुक्त शिवार अभियान सन २०१५-१६ साठी निवडण्यात आलेल्या गावातील कामांसाठी खर्च केलेला आहे.

(४) प्रस्तुत प्रकरणी मा.लोकप्रतिनिधी यांचे तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) पुणे यांना चौकशी करून अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा जिल्हयात जलयुक्त शिवार योजनेंतर्गत सिमेंट बंधाऱ्याची कामे निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत**

**(४६) ११३७४४ (१०-०४-२०१८). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयात ठेकेदार व अधिकारी हे संगनमताने आर्थिक गैरव्यवहार करीत असल्याने कृषी विभागाकडून जलयुक्त शिवार योजनेंतर्गत करावयाची सिमेंट बंधाऱ्याची कामे निकृष्ट दर्जाची होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जावळी (जि.सातारा) तालुक्यात गेल्यावर्षी पहिल्याच पावसात निकृष्ट काम झालेले सिमेंट बंधारे वाहून गेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने संपूर्ण सातारा जिल्हयातील जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत बांधण्यात येणाऱ्या सिमेंट बंधा-यांचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन दोषी ठेकेदार व संबंधित अधिकारी यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (३१-०५-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिवरे (ता.पारोळा, जि.जळगांव) येथे जिल्हा परिषदेच्या सिंचन विभागांतर्गत जलयुक्त शिवार योजनेंतर्गत सिमेंट नाला बांधण्याबाबत**

**(४७) ११३९२४ (०४-०४-२०१८). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवरे (ता.पारोळा, जि.जळगांव) येथे जिल्हा परिषदेच्या सिंचन विभागांतर्गत जलयुक्त शिवार योजनेंतर्गत सिमेंट नाला बांध मंजूर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नाला बांधाचे कामासंदर्भात शेतकऱ्याने संबंधिताकडे तक्रार वजा अर्ज केलेले असतानाही नालाबांधाचे काम न करताही रु.७ लाख रुपये संबंधित कंत्राटदाराला संगनमताने अदा करण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषी असणाऱ्या अधिकारी व कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२८-०५-२०१८) :** (१) ते (४) शिवरे गावात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत पाझर तलाव दुरूस्तीचे काम मंजूर करण्यात आले असून झालेल्या कामाचेच देयक अदा करण्यात आलेले आहे. झालेल्या कामामध्ये कोणताही गैरव्यवहार आढळून आलेला नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### किनवट (जि.नांदेड) तालुक्यात सागवानाची अवैधरित्या तोड होत असल्याबाबत

**(४८) ११४००६ (३१-०३-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर)** : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखली बु. (ता.किनवट, जि.नांदेड) येथे नांदेड वनविभागाने छापा टाकून सागवानाचे लाकूड, फर्निचर इत्यादी रुपये ५० लाखांचा माल जप्त केल्याची घटना माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लाकूड तस्करीसाठी आळा घालण्यासाठी गेलेल्या वन विभागाच्या पथकावरही सागवान तस्करांकडून हल्ले करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अवैधरित्या सागवानाची तोड व लाकडाची तस्करी कायमस्वरुपी रोखण्यासह दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.

नांदेड वनविभागातील चिखली बु. (ता.किनवट, जि.नांदेड) येथे दिनांक १.२.२०१८ रोजी वनविभागाने टाकलेल्या छाप्यामध्ये पकडण्यात आलेला माल चिराण सागी माल ४८.६३३८ घनमीटर व गोल माल १३.२७६ असा एकूण ६१.९१२८ घनमीटर सागी माल पकडण्यात आलेला आहे. सदर मालाची किंमत रु.२२,७०,२१७/- इतकी आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) सदरहू प्रकरणी २५ आरोपी विरुध्द भारतीय वन अधिनियम, १९२७ अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे. चौकशी प्रगती पथावर आहे.

अवैध सागवानाची तोड व तस्करी रोखण्यासाठी नेहमी जंगलगस्त करण्यात येते. फिरते पथक व स्ट्राईक फोर्स यांचेद्वारे गस्त करुन तोडीवर नियंत्रण केले जाते. नियमित बिट निरीक्षण केले जाते. संयुक्त वन व्यवस्थापन समितीची मदत घेतली जाते. खबऱ्याकडून देखील माहिती घेण्यात येते. आवश्यकतेनुसार पोलीस व महसूल विभागाची मदत घेतली जाते.

---

**सांगली जिल्हयातील सागरेश्वर वन्यजीव अभयारण्यात प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे लागलेल्या आगीत शेकडो एकर वनक्षेत्राचे झालेले नुकसान**

**(४९) ११४७७६ (०९-०४-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील सागरेश्वर वन्यजीव अभयारण्यात प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे लागलेल्या आगीत शेकडो एकर वनक्षेत्राचे नुकसान झाले असल्याचे दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आगीची व्याप्ती मोठी असूनही तेथे अदयाप वनविभागाच्या वरिष्ठ अधिका-यांनी भेट दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या आगीची चौकशी करुन संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३१-०५-२०१८) :** (१), (२) व (३) दि.२८ डिसेंबर २०१७ रोजी सागरेश्वर अभयारण्यातील ताकाहरी कडील बाजूकडे आग लागल्याचे निदर्शनास आले आहे. सदरची आग लागल्याची घटना गस्ती करण्या-या वन कर्मचा-यांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी त्वरीत स्थानिक नागरीकांच्या मदतीने आग विझवली. सदर आगीत ५ हेक्टर क्षेत्र जळीत झाली असून रु.५००/- इतकी नुकसानी झाली आहे. सदर आगीच्या घटनेबाबत चौकशी केली असता सदरची आग ही अभयारण्य क्षेत्रातून जाणा-या विद्युत वाहिनी इलेक्ट्रीक पोल वरील शार्ट सर्कीटमुळे लागल्याचे निष्पन्न झाले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भरतपूर (जि.नाशिक) अशी ओळख असलेल्या नांदूरमध्यमेश्वर या परिसराला "रामसार" चा दर्जा देण्याबाबत**

**(५०) ११५२७३ (३१-०३-२०१८). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील भरतपूर (जि.नाशिक) अशी ओळख असलेल्या नांदूरमध्यमेश्वर या परिसराला "रामसार"चा दर्जा देण्याचा निर्णय अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक, मुंबई यांनी घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदूरमध्यमेश्वरच्या रुपाने राज्यातील पहिले ''रामसार'' (पाणथळ) होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ''रामसार'' (पाणथळ) चा दर्जा नांदूरमध्यमेश्वरला देण्याच्या अनुषंगाने अंतिम निर्णयात्मक कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०५-२०१८) :** (१), (२) व (३) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग पत्र क्र. डब्ल्युएलपी-१०.१७/प्र.क्र.२६३/फ-१, दि. १७/११/२०१७ अन्वये नांदुरमध्यमेश्वर जलाशय क्षेत्र "रामसार" (पाणथळ) घोषित करण्याकरीता प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी पर्यावरण, वने व वातावरण बदल, मंत्रालय, नवी दिल्ली यांना पाठविण्यात आला आहे.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

**मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर**
**मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.**